महासागर

शनिवार, दि. 22 मार्च 2025

अमरावती



# मोठे मासे वाचविण्याकरिता राज बागरींना सॉफ्ट कॉर्नर

## शहर पोलिसांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - एक नाही तर दोन वेळा सेवानिवृत्तीच्या दिनांकात बदल करणारे अमरावतीचे तत्कालीन डेप्युटी आरटीओ राज बागरी यांना गाडगेनगर पोलिसांकडून विशेषत: बड्या अधिकाऱ्यांकडून कारवाई संदर्भात सॉफ्ट कॉर्नर दिला जात आहे. शासनाची फसवणूक करण्यासंदर्भात गंभीर गुन्हे दाखल झालेले असतानाही बागरींना तब्बल 8 महिन्यांपासून अटक करण्यात आली नाही. इतकेच नाही तर दोन दिवसांपुर्वी ताब्यात घेतलेले असतानाही फक्त नोटीस देवून सोडण्यात आले. मोटर परिवहन आयुक्तालय व मोटर परिवहन मंत्रालयात बसलेले बडे मासे (अधिकारी) वाचविण्याकरिता शहर पोलिसांची ही धडपड असल्याचे या प्रकारातून अगदी स्पष्ट दिसत आहे.

आपले शालेय कागदपत्रांमध्ये व सेवापुस्तकावर खाडाखोड करत आपले वय तब्बल दोन वर्ष वाढवून शासकीय सेवेत राहणारे तत्कालीन डेप्युटी आरटीओ राज बागरी यांच्या या कटामध्ये फक्त एकटे नसून मोटर परिवहन आयुक्तालय व मोटर परिवहन मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांचा समावेश नक्कीच आहे. राज बागरी यांनी एकदा नाही, तर दोनदा आपले सेवानिवृत्ती वय वाढविले. या वयाचे खाडाखोड केलेले दस्तावेज आणि तेही झेरॉक्स त्यांनी मोटर परिवहन उपायुक्त संजय मैत्रेवार व मोटर परिवहनचे तत्कालीन सचिव भरत लांघी यांच्याकडे सादर केले. हे दोन्ही अधिकारी बड्या हुद्दयावर आणि उच्च शिक्षीत आहे. सर्वसामान्य व्यक्तीला कागदामधील घोळ दिसत असताना या दोन्ही अधिकाऱ्यांनी या कागदपत्रांकडे दुर्लक्ष कसे काय केले? असा प्रश्न या प्रकरणातून निर्माण होत आहे. दै.महासागर ने यापुर्वीही चालविलेल्या वृत्तमालिकेमध्ये वारंवार या मुद्दयावर प्रकाश टाकला आहे. मात्र अतिशय चाणाक्ष आणि आर्थिक तेल लावलेले अधिकारी वारंवार या प्रकरणातून सटकत असताना दिसत आहे. बागरी यांची बनवाबनवी पुढे येताच वरिष्ठांनी लांघीकडून परिवहन मंत्रालयाच्या आस्थापनेचा प्रभार का काढून घेतला? असा सवालही पुढे येत आहे. बागरी यांना



अटक करुन पोलीस कस्टडी रिमांड घेतल्यास या दोन्ही अधिकाऱ्यांचे नाव बागरी यांच्या तोंडातून बाहेर पडेल याची दाट शक्यता आहे, त्यामूळे बागरींना वाचविले तर आपण आपोआपच सेफ झोन मध्ये जावू अशी धारणा असलेले बडे मासे आपल्याच पोलीस अधिकारी वर्गाचा आधार घेवून या प्रकरणातून सटकण्याचा प्रयत्न करित आहे. आता राजकीय हस्तक्षेप या प्रकरणाला काय दिशा देते हे पाहण्यासारखे राहील.

# एडीसीसी चे संचालक प्रकाश काळबाडे अखेर अपात्र

**सहकार मंत्र्याचे आदेश**







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - सहकार व पणन विभागाने दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे (एडीसीसी) संचालक प्रकाश काळबांडे यांचे पदासंदर्भात अपात्रतेबाबतचा अमरावती विभागीय सह निबंधक प्रविण फडणीस यांनी दिलेला आदेश कायम (दि.20) केला आहे. त्यामुळे प्रकाश काळबांडे हे जिल्हा बँकेच्या संचालक पदासाठी अपात्र ठरले आहे.

अमरावती विभागीय सहनिबंधकाकडे 9 जानेवारी रोजी संचालक आनंद काळे यांनी दाखल केलेल्या तक्रारीबाबत विभागीय सह निबंधक प्रविण फडणीस यांनी आदेश निर्गमीत करत प्रकाश काळबांडे यांना बँकेचे संचालक म्हणून राहण्यासाठी अपात्र असल्याचे नमुद केले होते तसेच विद्यमान संचालक मंडळाच्या उर्वरीत कालावधीसाठी त्यांचे पद रिक्त घोषित केले. या निकालाच्या पार्श्वभूमीवर प्रकाश काळबांडे यांना संचालक पदावरुन अपात्र करण्याची तक्रार 24 जुलै 2024 रोजी करण्यात आली होती. तक्रारीच्या आधारावर विभागीय सह निबंधक यांच्याकडे दाखल असलेले प्रकरण पाहता प्रकाश काळबांडे यांनी शासनाकडे अर्ज दाखल केला होता. त्यावर उच्च न्यायालयानेही आदेश पारीत केला होता. प्रकाश काळबांडे यांनी दाखल केलेल्या या प्रकरणी सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाने उच्च न्यायालयाने 13 डिसेंबर 2024 रोजी दिलेल्या आदेशाला अनुसरून सदर प्रकरणी दोन्ही पक्षाचे म्हणने ऐकून घेत 13 फेब्रुवारी 2025 रोजी प्रकरण बंद करत निर्णयासाठी राखुन ठेवले होते. यावर 20 मार्च रोजी निर्णय देत काळबांडे यांना अपात्र ठरविले आहे.



> या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे सांगीतले तसेच आपल्याला अद्याप तरी अपात्रतेबाबत कुठलीच नोटीस किवा पत्र प्राप्त झाले नाही, तसे पत्र व आदेश प्राप्त झाल्यावर विधी तज्ञांशी चर्चा केल्यावर पुढील निर्णय घेतला जाईल.
>
> **प्रकाश काळबांडे,**
> **एडीसीसी चे माजी संचालक.**

# दुचाकी चोराकडून 4 मोटारसायकली जप्त

## फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - शहरातील फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याला मोटारसायकल चोरी प्रकरणात मोठे यश मिळाले असून चोरीची एकूण चार वाहने जप्त करण्यात आली आहेत. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी शाम तेजीलाल जाभेकर (30, कारडा, ता. धारणी, जि. अमरावती) याला अटक केली आहे.

फिर्यादी सागर मनोहरराव गोडसेलवार (34, बेलपुरा, अमरावती) यांनी त्यांची एमएच 27 सीएम 6921 क्रमांकाची दुचाकी राजेंद्र कॉलनी येथील नमस्कार पान सेंटरजवळ पार्क केली होती. काही मिनिटांनी ते परत आले असता त्यांची दुचाकी चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तक्रारदाराने तात्काळ फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात 1 मार्च रोजी अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी या चोरीचा सखोल तपास सुरू केला. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या ठोस माहितीच्या आधारे पोलिस पथकाने आरोपी शाम जाभेकर याला त्याच्या गावातून ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपला सहभाग कबूल करून चोरीच्या मोटारसायकलींची माहिती दिली.


आरोपींच्या सांगण्यावरून पोलिसांनी एकूण चार चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. त्यांची एकूण किंमत 2,15,000 रुपये आहे. सदर कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, उपायुक्त (मुख्यालय) कल्पना बारावकर, उपायुक्त (परिमंडळ-1) सागर पाटील, सहायक आयुक्त (फ्रेजरपुरा) कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक नीलेश करे, नीलेश गावंडे, सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र सहारे, पोलिस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलिस कर्मचारी, सुभाष पाटील, शशिकांत गवई, सचिन बोरकर, सागर चव्हाण, जावेद पटेल आदींचा सहभाग होता.

# श्रीसंत अच्युत महाराज हार्ट रुग्णालयाच्या आठ मजली नव्या इमारतीचे लोकार्पण आज

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती**









**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )** - पश्चिम विदर्भातील हृदयविकारग्रस्त रुग्णांसाठी आधुनिक वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा गाठत श्रीसंत अच्युत महाराज हार्ट रुग्णालय आता 250 खाटांचे अत्याधुनिक सुपर स्पेशलिटी हृदय रुग्णालय म्हणून कार्यरत होत आहे. या रुग्णालयाच्या नवीन आठ मजली इमारतीचे उद्घाटन व द्वितीय कॅथलॅबचे लोकार्पण शनिवारी (दि.22) सकाळी 11 वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होत आहे.

या सोहळ्याला राज्य आणि केंद्र शासनातील मान्यवर, वैद्यकीय क्षेत्रातील प्रमुख तज्ञ, प्रशासकीय अधिकारी आणि समाजसेवी व्यक्ती उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष सुधीर दिवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### आतापर्यंत 3 हजार 371 ओपन हार्ट शस्त्रक्रिया यशस्वी

7 जुलै 2006 ते 14 मार्च 2025 या कालावधीत रुग्णालयात 3 हजार 371 ओपन हार्ट शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत. तसेच अँजिओप्लास्टी 18,802, अँजिओग्राफी 36875 आय व्ही फिल्टर 69, पेसमेकर प्रत्यारोपण 381 यासारख्या 64 हजार 310 उपचार प्रक्रिया रुग्णालयाने केल्या असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर यांनी दिली. या वेळी पत्रकार परिषदेत अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, संत सचिनदेव महाराज, सागर पासेबंद, मुकुंद वाईकर, डॉ. मुरलीधर वाडेकर, डॉ. गुणवंत डहाने, दत्ताजी शिंदे आदी उपस्थित होते.

### नवीन इमारतीत विशेष सुविधा

नवीन आठ मजल्या इमारतीत रुग्णांसाठी विशेष सुविधा असणार आहे. यात 2 नवीन सीव्हिटीएस शस्त्रक्रिया विभाग, 2 नवीन कॅथलॅब, 25 विशेष कक्ष (सिंगल, डबल), 65 आयसियु खाटा, 35 खाटांचे सीव्हिटीएस वार्ड, 35 खाटांचे कार्डिओलॉजी वार्ड, संपूर्ण इमारत वातानुकूलित, आरओ पाणी व स्वच्छता व्यवस्था आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.

श्रीसंत अच्युत महाराज यांनी सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळाव्यात. या विचाराने प्रेरित होऊन आरोग्यसेवा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आज ते हार्ट हॉस्पिटल म्हणून उदयास आले आहे. महाराजांनी लोकवर्गणीतून, लोकसहभागातून दहा रुपये प्रति वीट उपक्रमातून राज्यस्तरीय आरोग्य सेवेचा प्रवास केला. संत अच्युत महाराजांनी हा उपक्रम हाती घेतला होता. जनतेच्या सहभागातून हृदय रुग्णालयाचे पहिले पाऊल पडले. श्रीसंत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल हे पश्चिम विदर्भातील सर्वात मोठे हृदय उपचार केंद्र म्हणून स्थान मिळवले असल्याचे आयोजकांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा आज पुरस्कार वितरण सोहळा

**ना.नितीन गडकरी आणि दोन उत्कृष्ट महिला शेतकरीहोणार सन्मानित**



### नवनिर्वाचित वि.प. सदस्य आ.संजय खोडके व राष्ट्रीय खेळाडू दीप्ती काळमेघ हिचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्काराचे वितरण शनिवार दि.22 मार्च 2025 रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात करण्यात येणार असून या समारंभात केंद्रीय दळणवळणव रस्ते वाहतूक मंत्री ना.नितीन गडकरी यांना प्रतिष्ठेच्या 'डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार 2024' ने सन्मानित करण्यात येणार आहे. रु.पाच लक्ष रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र,शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विदर्भातील दोन उत्कृष्ट शेतकरी महिलांनाही या सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल.नवनिर्वाचित विधान परिषद सदस्य आ.संजय खोडके यांचा आणि उत्तराखंड येथे झालेल्या 38 व्या राष्टीय क्रीडा स्पर्धेत 2 सुवर्ण आणि एक रौप्य पदक पटकाविणाऱ्या कु.दीप्ती आशिष काळमेघ या विद्यार्थिनीचा देखील या सोहळ्यात सत्कार करण्यात येईल. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात शनिवार दि.22 मार्च 2025 ला सकाळी साडे दहा वाजता संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनप्र.देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्याला केंद्रीय दळण वळण व रस्ते वाहतूकमंत्री ना.नितीन गडकरी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून खासदार शरदचंद्र पवार हे प्रमुख अतिथी म्हणून आभासी पद्धतीने उपस्थित राहतील. राज्यसभा सदस्य खा.डॉ.अनिल बोंडे, अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे आणि अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके हे या सोहळ्याला अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

या सोहळ्यात खासदार शरदचंद्र पवार यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला 'शारदा पवार यांना उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार 2024' आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्यावतीने 'श्रीमती विमलाबाई देशमुख शेतीनिष्ठ महिला शेतकरी पुरस्कार 2024' असे दोन पुरस्कार उत्कृष्ट महिला शेतकऱ्यांना दिल्या जाणार आहेत. रोख रु.1,11,111/- (रुपये एक लक्ष अकरा हजार एकशे अकरा), स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, केंद्र सरकारने डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या 125 व्या जयंती प्रीत्यर्थ प्रसारित केलेले 125 रुपयांचे नाणे, साडी, चोळी, शाल व श्रीफळ असे शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप आहेत रु.51000/- रोख, स्मृतिचिन्ह, साडी,चोळी, शाल व श्रीफळ असे 'श्रीमती विमलाबाई देशमुख शेतीनिष्ठ महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण सोहळ्याला संस्थेचे उपाध्यक्ष सर्वश्री.ॲड.गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे, प्रा.सुभाषराव बनसोड, स्वीकृत सदस्य सर्वश्री.प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ.पी.एस.वायाळ ,डॉ.अमोल महल्ले हे प्रामुख्याने उपस्थित राहणार असून या सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे यांनी केली आहे.

# महापालिकेचे समतोल अंदाजपत्रक सादर

**कमाई इतकाच खर्च ■ शाळांची स्थिती, आरोग्य सुविधांवर भर**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** - अमरावती महापालिकेचे सलग तिसऱ्या वर्षी प्रशासक काळातील 2025-26 मधील 887 कोटींचे अंदाजपत्रक शुक्रवारी (दि.21) सादर करण्यात आले. महापालिकेला 401 कोटीचे उत्पन्न अपेक्षित असून खर्च देखील जवळपास 400 कोटींचा अपेक्षित आहे. विशेष म्हणजे या बजेटमध्ये शिक्षण आणि आरोग्यावर विशेष भर दिला आहे, असे यावेळी आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी सांगितले. हा अर्थसंकल्प सादर करताना मागील चार वर्षातील अर्थसंकल्पाचे विशेष अवलोकन केल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य आणि शिक्षणावर तब्बल 130 कोटींच्या खर्चाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. नऊ आरोग्य मंदिर वाढणार आहेत. शाळांची स्थिती सुधारणे, महिलांसाठी विशेष आरोग्य सुविधा, अग्निशमन विभागातील सोयी सुविधांमध्ये भर, जवळपास 22 प्रमुख चौकातील सौंदर्यकरण आदींवर यावेळी त्यांनी भर दिला.

आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी 29 ठिकाणी शासनाची आरोग्य मंदिरे प्रस्तावित होती. त्यापैकी 20 आरोग्य मंदिरे कार्यान्वित झाली असून ती पूर्ण क्षमतेने सुरु आहेत. उर्वरीत 9 आरोग्य मंदिरे या वर्षी कार्यान्वित करण्यात येईल. या शिवाय पालिकेचे 9 प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आरोग्य सुविधा या अर्थसंकल्पीय शीर्षात 130.75 कोटी इतकी तरतूद करण्यात आली असून ती एकूण खर्चाच्या 32.63 टक्के इतकी आहे, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.महानगरपालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी सर्व 63 शाळा डिजीटल झालेल्या असून सर्व वर्गखोल्या डिजीटल करण्याचे प्रस्तावित आहे, असे आयुक्तांनी सांगितले. सन 2025-26 या वर्षात महानगरपालिकेची प्रारंभिक शिल्लक 161.71 कोटी रुपये यामध्ये महसूली शिल्लक 1.03 कोटी, भांडवली शिल्लक 144.23 कोटी, असाधारण ऋण व निलंबन शिल्लक 16.45 कोटी रुपयांचा समावेश आहे. सर्व बाजूने मिळणारे महसूली उत्पन्न 401.20 कोटी, भांडवली उत्पन्न 303.97 कोटी, असाधारण ऋण व निलंबन उत्पन्न 20.80 कोटी रुपयांचा समावेश आहे. असे एकूण 725.97 कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

भांडवली खर्चासाठी प्रारंभिक शिल्लक 144.23 कोटी व भांडवली उत्पन्न 303.97 कोटी असे एकूण 448.20 कोटी प्राप्त निधीचा विनियोग शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीनुसार करावा लागतो, त्यामुळे महापालिकेकडील प्रारंभिक महसूली शिल्लक 1.03 कोटी व महापालिकेचे एकूण महसूली उत्पन्न 401.20 कोटी असे एकूण 402.23 कोटी रुपये एवढे आहे. यामधूनच महापालिकेला प्रलंबित व आवश्यक खर्चाची कामे करावी लागतात, असे सचिन कलंत्रे यांनी सांगितले.

सन 2025-26 मध्ये एकूण खर्च 739.74 कोटी इतका अपेक्षित आहे, यामध्ये महसूली खर्च 400.66 कोटी, भांडवली खर्च 316.28 कोटी व असाधारण ऋण व निलंबन खर्च 22.80 कोटी रुपयांचा समावेश आहे. वर्षाअखेर महसूली अखेरची शिल्लक 1.57 कोटी, भांडवली अखेरची शिल्लक 131.92 कोटी व असाधारण ऋण व निलंबन अखेरची शिल्लक 14.46 कोटी, अशाप्रकारे एकूण 147.46 कोटी शिल्लक राहील, असे आयुक्तांनी सांगितले. सन 2025-26 या आर्थिक वर्षात नविन मालमत्ता कराच्या कक्षेत आणल्यामुळे तसेच सुधारित दराने कर आकारणी करण्यात येत असून महसूली उत्पन्नाचे इतर स्त्रोत वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत, असे प्रशासक सचिन कलंत्रे यांनी सांगितले.

### 484 कोटी थकबाकी

अमरावती महापालिकेवर जवळपास 484 कोटींची थकबाकी आहे. यापैकी 57 कोटी रुपये कर्मचाऱ्यांचे थकीत वेतनाचे आहे. त्याच प्रकारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ला 161 कोटी रुपये देयक अदा करणे बाकी आहे. पन्नास टक्क्यांपेक्षा अधिकच्या सरकारी अनुदानावर अवलंबून असलेले 887 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक प्रशासक तथा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सादर केले. मालमत्ता करासह इतर करांमधून 337 कोटी रुपयांचे उत्पन्न गोळा करण्याचा महापालिकेचा प्रयत्न राहणार आहे.

> महापालिकेअंतर्गत खूप काही करण्याच्या योजना आखता आल्या असत्या परंतू महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता ज्या योजना सुरु आहेत, त्यांना पुर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. या योजना अर्धवट ठेवून नव्या योजनांना सुरुवात केली तर परिस्थिती हाताबाहेर जाईल. त्यामूळेच हा खर्च आणि आवक यात समतोल राखणारा अर्थसंकल्प सादर केला जात आहे.
>
> **सचिन कलंत्रे,**
> **आयुक्त महापालिका अमरावती.**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# नागरिकांचे जीवनमान सुकर होण्यासाठी समन्वयाने कामे करा

**विभागीय आयुक्त श्वेता सिंघल | 100 दिवस कृती विकास आराखड्यांतर्गत मेळघाटातील दूर्गम गावांना भेट व पाहणी**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** - राज्य शासनाने 100 दिवसांसाठी सात कलमी कृती आराखडा निश्चित केला असून त्यात जनतेच्या तक्रारींचे निवारण, सुकर जीवनमान तसेच क्षेत्रीय कार्यालयांना भेटी हे घटक अंतर्भूत आहेत. मेळघाटसारख्या दूर्गम, आदिवासी बहुल भागातील नागरिकांचे जीवनमान सुकर होण्यासाठी प्रत्येक विभागांनी समन्वयाने कामे करुन त्यांच्या अडचणी व समस्या सोडवाव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी आज दिले.सेमाडोह पर्यटन संकुल येथे 100 दिवस कृती आराखड्यांतर्गत मेळघाट क्षेत्रातील गावांना भेट व ग्रामस्थांच्या प्रश्नांचे निराकरण या कार्यक्रमांतर्गत सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, अपर आयुक्त अजय लहाने, रामदास सिध्दभट्टी, सुरज वाघमारे, उपवनसंरक्षक सुमीत सोळंके, दिव्यभारती एम., प्रकल्प अधिकारी प्रियवंदा म्हाळदळकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत महसूल विभागाच्या दहा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मेळघाट परिसरातील दहा गावांना भेट देऊन तेथील ग्राम पंचायत, अंगणवाडी, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्र, रेशन दुकान, सोयी सुविधांची आदींची पाहणी करुन ग्रामस्थांचे प्रश्न व समस्या जाणून घेतल्या. सिंघल म्हणाल्या की, 100 दिवस कृती आराखड्यांतर्गत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मेळघाटातील गावांना प्रत्यक्ष भेटी व तेथील ग्रामस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनस्तरावर करावयाच्या उपाययोजनाबाबत आढावा घेण्यात आला. मेळघाटातील नागरिकांचे जीवनमान हे प्रामुख्याने जंगल व जंगलातील उत्पादनांवर आधारित आहे. येथील क्षेत्राचा विकास होण्यासाठी याठिकाणी पाणी पुरवठा, शिक्षण, आरोग्य, वीज, रस्ते, रोजगार आदी मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. टंचाईग्रस्त गावांना नियमितपणे पाणी पुरवठा होण्यासाठी विहिर खोलीकरण, गाव तलावातील गाळ काढून तेथे पाणी संचयनासाठी प्रभावी उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संबंधित विभागांनी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. गावांत वीज पुरवठा अखंडीतपणे सुरु राहण्यासाठी विद्युत विभागाने सब स्टेशनची निर्मितीसाठी नियोजन करावे तसेच सोलर योजना प्रभावीपणे राबवावी.

महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून भेटी दिलेल्या गावांतील प्रश्नांबाबत आढावा घेवून त्यापुढे म्हणाल्या की, पिढ्यांपिढ्यापासून वन जमीनीवर शेती करणाऱ्या आदिवासी बांधवांना वन हक्क पट्ट्यांचा ताबा देण्यासाठी वन विभागाने जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. यासाठी विशेष मोहीम राबवावी. वन विभागाच्या अखत्यारित असलेली कामे स्थानिक गावकऱ्यांना प्राधान्याने देण्यात यावी. त्यांचे मजूरीचे मस्टर अद्ययावत ठेवून वेळेत मजूरीचे चुकारे करण्यात यावे. वन्य प्रान्यांच्या हल्ल्यात मृत पावलेल्यांच्या वारसांना तत्काळ सानुग्रह मदत तसेच जखमींना तत्काळ उपचारासाठी वन विभागाने सहाय्य करावे. जंगल परिक्षेत्रात शेत असणाऱ्यांना शेतीपीकांसाठी विहिर तसेच बोअर करण्यासाठी परवानगी देण्यात यावी.100 दिवस कृती विकास आराखड्यांतर्गत मेळघाट क्षेत्रातील वझ्झर, घटांग, सलोना, भवई, सेमाडोह, माखला, चि खली, तारुबांधा, बोरी, केशरपूर, कारा या गावांना भेटी देऊन तेथील ग्रामस्थांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्यात.

### विभागीय आयुक्तांची शंकरबाबा पापडकरांच्या बालसुधारगृहास भेट

मेळघाट क्षेत्रातील गावांना भेट या कार्यक्रमांतर्गत प्रारंभी विभागीय आयुक्तांनी वझ्झर येथील ग्राम पंचायत आणि पद्मश्री शंकरबाबा पापडकर यांच्या स्व.अंबादासपंत वैद्य मंतिमंद, मुकबधीर बेवारस बालसुधारगृहास भेट दिली व मतीमंद मुला-मुलींशी संवाद साधून आस्थेवाईपणे विचारपूस केली. यावेळी शंकरबाबा पापळकर यांनी बालसुधारगृहातील 18 वर्षावरील अनाथ मुलांना कायमचे पालकत्व व पूनवर्सन होण्याचा कायदा होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत, अशी मागणी केली. यासंबंधी राज्यभवन येथे बैठक लावून सकारात्मक निर्णय होण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही विभागीय आयुक्तांनी यावेळी दिली.

# गोवंशाची अवैध वाहतूक करताना पकडले

**14 गोवंशा ना दिले जीवनदान ■ अमरावती स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**





**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.21 )** - स्थानिक गुन्हे शाखा अमरावती ग्रा.च्या पथकाने केलेल्या धडाकेबाज कारवाईत मोर्शी येथे 14 गोवंशाना जीवदान मिळाले आहे. स्था.गू.शाखा अमरावती ग्रामीणचे पथक मोर्शी तालुक्यात गस्त करीत असताना त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून सदर कारवाई करण्यात आली.

येथील हिवरखेड मधून काही गोतस्कर एम पी 04 जी. बी 1436 क्रमांकाच्या एका पिकप वाहनाद्वारे गोवंशाची अवैध वाहतूक करत असल्याची गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली. यावेळी पोलिसांनी केलेल्या चित्तथरारक पाठलागामध्ये मोर्शी तालुक्यातील अंबाडा येथे सदर गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनाला पकडण्यात यश आले आले. सदर वाहनातील पाच गायी व नऊ गोरे असे एकूण 14 गोवंशाला जीवदान मिळाले. त्यांना पुढील उपचारार्थ येथील गोरक्षण संस्थेत पाठवण्यात आले आहे. शुक्रवारी (दि. 21) पहाटे 4 वाजता झालेल्या या कारवाईमध्ये या पिकअप गाडीच्या पुढे पेट्रोलिंग करत जाणारी इंडिका विस्टा ही गाडी सुद्धा पोलिसांनी ताब्यात घेतली. तसेच तस्करी करणारे व पेट्रोलिंग करणारे या दोन्ही वाहनातील एकूण पाच आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला असून एक आरोपी अटकेत आहे. सदर कारवाईदरम्यान तस्करांच्या वाहनांमध्ये धारदार घातक शस्त्र सापडल्याने आरोपींचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी गोरक्षकांमधून होत आहे. यावेळी 5 गायी, 9 गोऱ्हे, दोन गाड्या मिळून अंदाजे 9 लाख 10 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्राणी संरक्षण अधिनियम 5 (अ),(ब), प्राण्यांना निर्दयतेने वागणूक अधिनियम 11(ल), भादंविच्या कलम 281,125,3-5 व ङ्कङ्घ 4-25 आर्म ?क्ट इत्यादी कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई स्था. गु. शाखा अमरावती ग्रा.चे पो. नी. किरण वानखडे यांचे मार्गदर्शनात पो.उपनिरीक्षक सागर हटवार, पंकज फाटे, रवींद्र बावणे, भूषण पेटे, गजेंद्र ठाकरे, बळवंत दाभने व प्रज्वल राऊत यांनी केली. पुढील तपास मोर्शी पोलिसांकडे सुपूर्द केला असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# कारागृहातील बंद्याचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )** - जिल्हा सामान्य रुग्णालयात एका कारागृह बंद्याचा मृत्यू झाल्याची घटना 20 मार्च रोजी रात्री उघडकीस आली. आनंद सुखदेव बडक (57, रा. विर्शी, ता. भातकुली, जि. अमरावती) असे मृताचे नाव आहे. या घटनेची माहिती शिपाई नंदकिशोर दिंडलकर यांनी 21 मार्च रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

माहितीनुसार, 20 मार्च रोजी आनंद बडक यांच्या छातीत दुखत होते. त्यामुळे त्यांना कारागृहातील वैद्यकीय अधिकारी यांनी तपासले. त्यानंतर त्यांना कारागृहातील रुग्णालयात दाखल करून घेतले होते. परंतू त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद राजीक यांनी कारागृहातील गार्ड मंगेश सोळंके व स्वप्निल इंगळे यांना बंद्याला तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यास सांगितले. त्यानंतर बंद्याला रात्री 10.29 वाजता उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतू तेथील डॉक्टरांनी बंद्याला मृत घोषीत केले.

# बडनेरा रेल्वे स्थानकाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्या!

### हिंदू सूर्य प्रतिष्ठानची मागणी

### रेल्वे प्रबंधकांना निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगांव बारी, ( दि.21 )**- महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार साजऱ्या केल्या जाणाऱ्या जयंती दिनाचे औचित्य साधून बडनेरा रेल्वे स्थानकाच्या नवनिर्मित परिसराला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी बडनेरा येथील हिंदूसूर्य प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वेच्या शाखा प्रबंधकांना एक लेखी निवेदनही सादर केले. बडनेरा रेल्वे स्थानकाचे नुकतेच नूतनीकरण व विस्तार करण्यात आला आहे. या परिसराचे व रेल्वे स्थानकाचे छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक असे नामकरण केले जावे, अशी अमरावती जिल्ह्यातील शिवप्रेमींची भावना असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले होते.

निवेदन देतेवेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप सोळंके, मंगेश सोळंके, शिवम भिंडा, राहुल वगारे, प्रज्वल मेश्राम, अथर्व गायकवाड, हरीश पवार, अमर सरोदे, गोलू गिडवाणी, गोलू बजाज, आशु पंजवाणी, गोलू बोयत, तुशार भिडेकर, शाम चवरे, यश गोंड, योगेश काळे, सागर पवार, आर्यन दांडे, बंटी सोळंकी, मयूर मोहळ आदी उपस्थित होते.

### घरकुल योजनांसाठी व्हॉट्सअॅप क्रमांक सुरु

**अमरावती** - घरकुल योजनांची प्रभावी आणि जलद अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने 7769937336 हा व्हॉट्स ?प क्रमांक जारी केला आहे. लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते वेळेवर मिळाले नसल्यास जिओ टॅग फोटोवर आपले नाव, गाव आणि पंचायत समितीचे नाव नमूद करून या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सर्वांसाठी घरे हे शासनाचे महत्वाचे धोरण आहे.


# पांडूरंग आश्रमात उद्या भारुड व लोककलेची मेजवाणी





### ओंकारबाप्पु व इंदिराबाई जाधव स्मृतीदिन

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.21 )** - तालुक्यातील तोंगलाबाद येथील माजी सरपंच स्व. ओंकारराव (बाप्पू) जाधव व त्यांच्या पत्नी स्व. इंदिराबाई जाधव यांच्या 4 थ्या स्मृतीदिनानिमित्त तोंगलाबाद-सौंदळी फाट्यावरील श्री पांडुरंग हरी आश्रम येथे रविवार, 23 मार्च रोजी संध्याकाळी 7 वाजता सुप्रसिद्ध लोककलाकार हभप संतोष महाराज भालेराव (वाशिम) व टीव्ही कलावंत इशांत नांदेडकर आणि सागर मुंबईकर यांची महाराष्ट्राची लोक परंपरा जपणारी भारूड व लोककलेची जुगलबंदी रंगणार आहे. यामध्ये समाज प्रबोधनपर भारूड, गवळण, जोगवा, गोंधळ, लावणी अशा कलाप्रकारांची मेजवाणी मिळणार आहे.





याप्रसंगी जय बजरंग परिवाराचे संस्थापक व माजी आमदार स्व. तुकाराम बिडकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्याम गुणवंतांचा सन्मान यावेळी करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुंभारीच्या जय बजरंग परिवाराचे संचालक प्रकाश राहतील. प्रमुख अतिथी व सत्कारमूर्ती म्हणून खासदार बळवंत वानखडे व आमदार गजानन लवटे यांच्यासह जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी अध्यक्ष सुधाकर भारसाकळे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाळासाहेब हिंगणीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील गावंडे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गजानन जाधव उपस्थित रहाणार आहेत. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक गजानन जाधव, अरूण जाधव, प्रा. सदानंद जाधव, गणेश जाधव, किरण जाधव व जाधव परिवार आणि पांडूरंग हरि आश्रम तोंगलाबाद (सौंदळी) याजी केले आहे.

# 1990 सालातील बॅचचे विद्यार्थी 34 वर्षानंतर एकत्र





### आमलाच्या कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहमिलन

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.21 )** - मोर्शी तालुक्यातील आमला येथील शाळेत 1990 साली एकत्र दहावीचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी स्नेहमिलन सोहळ्याच्या निमित्ताने तब्बल 34 वर्षानंतर एकत्र आले होते. प्रदिर्घ कालावधीनंतर एकत्र आलेल्या या वर्ग मित्र व मैत्रिणी एकमेकांना भेटून गहीवरुन गेले होते. यावेळी विविध कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते.

या स्नेहमिलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे माजी प्राचार्य एम. जे. नेरकर होते. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी शिक्षक दीपकराव खेरडे, मालधुरे, रंगराव पाटील, बहातकर, गोपाल यावले, देवळे, वडनेरकर हे उपस्थित होते. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देत शाळेचे विद्यार्थी प्रमोद घाटोळ, प्रशांत पोहरकर, प्रमोद भगत या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अशा संमेलनातून जिव्हाळा जपला जातो, असे नेरकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले. आमच्या माजी विद्यार्थ्यांची प्रगती पाहुण आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो असे वक्तव्य खेरडे सर, देवळे सर, यावले सरांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय नागरीकर यांनी केले. यावेळी सर्व शिक्षकांचा शाल, श्रीफळ देऊन विद्यार्थ्यांनी सत्कार केला. साहित्य क्षेत्रात असणारे प्रमोद घाटोळ आणि निशा खापरे यांचा विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या हस्ते विशेष सत्कार केला. तर महाराष्ट्र पोलीस पदावर उत्कृष्ट कामगिरीबद्दल अनिल निंघोट यांचाही सत्कार करण्यात आला. मित्रांना एकत्रित आणल्याबद्दल अजय नगरिकर यांचाही सत्कार करण्यात आला. संचालन निशा खापरे तर आभार प्रदर्शन राजेश पाटील यांनी केले. याप्रसंगी यावले सर आणि देवळे सरांनी गणिताचा तास घेतला आणि पुन्हा वर्ग भरला. सगळ्या विद्यार्थ्यांचा आनंद ओसांडून वाहत होता. कार्यक्रमाचे नियोजन अजय नागरीकर, अविनाश बकाले, राजेश पाटील, प्रमोद भगत, प्रमोद घाटोळ, अनिल निंघोट, मनोहर केने, प्रशांत पोहरकर, विलास कटनकर, सुनील कटनकर, आदिनाथ वाकडे, विठ्ठल अर्मळ, गिरीश पोलाड, विठ्ठल अर्मळ, प्रवीण तिरथकर यांनी केले. यावेळी चारुलता भोजने, रंजना देव्हारे, कल्पना वानखडे, माधुरी महाले, अरुणा केणे, विजया बोबडे, संगीता राऊत, माला मेश्राम, कुसुम पानझडे, निशा खापरे आदी उपस्थित होते.

# तरुणांनी स्वत:चे अस्तित्व सिद्ध करावे!

**हभप शिवलीला पाटील यांचे उद्गार | येरला येथे जाहिर किर्तन**



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.21 )**- सण, उत्सव साजरे करताना तरुणांनी आपल्या हातून चुकीचे घडणार नाही, याची काळजी घेतली पाहीजे. खरतर पूर्वजन्मीचे पापच माणसाला भजनापासून दूर ठेवते. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहुण स्वतःचे अस्तित्व सिद्ध केल्यास त्यांना कोणाच्याही मागे फिरण्याची गरज राहणार नाही, असे उद्गार महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध महिला कीर्तनकार हभप शिवलीला पाटील यांनी काढले. मोर्शी लगतच्या येरला येथे सुरु असलेल्या भागवत सप्ताहात त्यांचे जाहीर कीर्तन पार पडले. त्याप्रसंगी पाटील बोलत होत्या.

आजच्या तरुणांना उद्बोधन करताना शिवलीलाताईंनी शिवाजी महाराजांचे जीवनातील काही प्रसंग कथन केले. शिवरायांवर मातोश्री जिजाऊ यांचे संस्कार होते, असे सांगून त्यांनी संस्काराचे सामर्थ्य पटवून दिले. ज्या दिवशी महाराष्ट्रातील तरुण काकडा व हरिपाठ करतील त्या दिवसापासून महाराष्ट्रावर कोणीही शत्रू वाकड्या नजरेने पाहणार नाही, असे त्या म्हणाल्या. महिला व पुरुषांनी प्रपंच करताना कसे वागावे, कोणती काळजी घ्यावी, यावरही त्यांनी भाष्य केले. ज्ञानेश्वरीचे महत्व सांगून त्यांनी अनिष्ठ रुढी परंपरांवर जोरदार प्रहार केला. कीर्तन हे मनोरंजनाचे साधन नसून स्वत:चा उद्धार घडवून आणण्याचे माध्यम आहे. पूर्वजन्मीचे पाप माणसाला भजन करू देत नाही. ज्याला देहाची किंमत नाही तो देवाची किंमत काय करणार असा टोला त्यांनी व्यसनी लोकांना लगावला.

पैसा कमावणे अवघड नसून कुठे खर्च करावा हे मात्र नक्कीच अवघड आहे, असे सांगून त्यांनी आयोजक युवकांचे अभिनंदन केले. नामचिंतन केल्याने संपूर्ण आयुष्य सुखकर होते असे त्यांनी सांगितले. आपल्या आई-वडिलांना नजर खाली घालावी लागेल असं तरुणांनी वागू नये आणि ज्या लोकांना आपली प्रगती सहन होत नाही त्यांचे पासून लांब राहिले पाहिजे, हे सुद्धा इतिहासने शिकविले आहे, असेही पाटील म्हणाल्या. किर्तन ऐकण्यासाठी येरला गावासह मोर्शी शहरातील भाविकांनी सुद्धा गर्दी केली होती.



# वनमाला बहुउद्देशीय संस्थेतर्फे जलपात्राचे वाटप

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.21 )**- वनमाला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जलपात्राचे वाटप (दि.20)करण्यात आले. जनजागृती, पक्षांबद्दल प्रेम निर्माण व्हावं आणि पर्यावरणाशी समतोल राखण्यासाठी हा कार्यक्रम राबवण्यात येतो. दि. 20 मार्च जागतिक चिमणी दिवसानिमित्त मुदलियार नगर येथे महिलांना जलपात्र वाटून ते देण्याचं नेमकं कारण याची माहिती वनमाला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा प्रियंका जगताप यांनी दिली. आपल्या मनोगत त्यांनी सांगितले की, दरवर्षी आम्ही संक्रांतीनिमित्त सामूहिक हळदी कुंकवाचे कार्यक्रम घेतो, त्यामध्ये जलपात्राच्या स्वरूपात पक्षांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून वाण वाटल्या जाते. उन्हाळ्यात सुद्धा माणसाप्रमाणे पक्षी पाखरांना पाण्याची आवश्यकता असते म्हणून दरवर्षी पक्षी-पाखरांसाठी ही व्यवस्था केली जाते. आपणही अशा प्रकारे आपल्या घरी हे जलपात्र ठेवावं आणि या मोहिमेत सहभागी व्हावे,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शुभांगी नागरे, सुनिता उईके, भावना बिजवे, सविता शेंडे,मोनाली गुल्हाणे, श्रद्धा नागरे, प्रिती श्रीराव,मालू शिरभाते,शोभा निस्ताने, चंद्रप्रभा गुल्हाणे, रत्नप्रभा आसरे, स्वाती बांबटकर, अस्मिता बाहे, राधिका रावते, जयश्री सारंगपुरे, विमल भिसे, अधिरा बाहे, परी रावते, रियांश श्रीराव, भक्ती नागरे आदि उपस्थित होते.

# जीएमसी शहरापासून दूर अंतरावर नकोच!

## आ. सुलभा खोडके यांची लक्षवेधी सूचना | शहरातील नागपूर हायवे लगतच्या जागेचा प्रस्ताव मान्य करण्याची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.21 )-** येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) दोन वर्षांपासून सुरु झाले असून जिल्ह्यातील गोर-गरीब व सर्वसामान्य रुग्णांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळणे हेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची खरी उपलब्धता आहे. मात्र महाविद्यालय स्थापन करण्यासंदर्भात समितीने निवडलेली जागा ही शहरापासून 10 ते 15 किलोमीटर दूर असल्याने जिल्ह्यातील मेळघाट -धारणी भाग तसेच ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना तेथे जाणे दुरापास्त होणार आहे. त्यामुळे जागेसंदर्भात समितीने घेतलेला निर्णय बदलविण्यात यावा अशी आग्रही भूमिका मांडून आ.सुलभा खोडके यांनी अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शहरापासून दूर नकोच, तर शहरालगत नागपूर रोडवर हायवे जवळ जी शासकीय जागा आहे, त्याठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी आ. सुलभा खोडके यांनी राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशातून रेटून धरली आहे.

अधिवेशनात बोलतांना आ. सुलभा खोडके यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यामागच्या भूमिकेसंदर्भात सभागृहाला अवगत केले. केंद्र शासनाची किंवा राज्य शासनाची प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय निर्माण करण्याच्या भूमिकेमागील त्या-त्या जिल्ह्यातील व परिसरातील गरीब ,गरजूंना चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात त्यांना इतरत्र उपचाराकरिता जावे लागू नये असा उद्देश असतो. मात्र वैद्यकीय महाविद्यालय शहरापासून 10 ते 15 किलोमीटर दूर असल्याने रुग्णांना तेथे जाणे दुरापास्त होते. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेणारे विद्यार्थी हे काही अमरावतीचेच किंवा त्या भागातील नसतात. ते सीईटी, नीट मार्फत राज्यातील व देशातील विद्यार्थ्यांना त्यांच्या योग्यते नुसार प्रवेश मिळते. म्हूून वैद्यकीय महाविद्यालयातील उपलब्ध आरोग्याच्या सुविधा या जिल्ह्यातील लोकांना मिळण्यासाठी ते शहरात किंवा जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक गरीब गरजू रुग्णांना तेथे येणे सोयीचे ठरणार आहे. मात्र अमरावती शहरापासून 10 ते 15 किलोमीटर दूर जागेचा प्रस्ताव असल्याने त्याचा लाभ सामान्य गरजू रुग्णांना मिळणार नाही. तसेच धारणी ,मेळघाट सारख्या दुर्गम भागातील रुग्णांना सुद्धा ते गैरसोयीचे ठरणार आहे. याकडे सुद्धा आमदार महोदयांनी सभागृहाचे लक्ष वेधले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अमरावती करीता सद्या जी शहरापासून 10 ते 15 किलोमीटर दूर जागा निवडलेली आहे. त्या जागेचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा व पुन्हा बैठक घेऊन जागेसंदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणी आ.सुलभा खोडके यांच्या वतीने अधिवेशातून करण्यात आली.

# सूर्यकांतादेवी पोटे उत्कृष्ट साहित्य वाड्.मय पुरस्कार जाहीर

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ.रमाकांत कोलतेंना 'साहित्यव्रती' पुरस्कार









**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट, अमरावती यांच्यावतीने दिल्या जाणार्या 2024 च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षी यवतमाळ येथील सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक व विचारवंत डॉ. रमाकांत कोलते यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. विविध साहित्य प्रकारासाठी राज्यातील साहित्यिकांना सन्मानीत करणारी विदर्भातील ही मोठी पुरस्कार योजना आहे.

या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा अमरावती येथील विशाल मोहोड यांच्या ' कीड' या कादंबरीची निवड करण्यात आली आहे. उत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार जालना येथील प्रभाकर शेळके यांच्या 'डबल ढोलकी' या कथासंग्रहाला मिळाला आहे. तीर्थराज कापगते यांच्या 'मावळत्या गावाचे गाणे'या कवितासंग्रहाला उत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी पुरस्कार जाहीर झाला असून संमिश्र विभागात वैचारिक वाड्.मयासाठी वर्धा येथील विनोद राऊत यांच्या 'नामदेव ढसाळ यांची कविताऱ्आस्वाद आणि चिकित्सा या समीक्षा ग्रंथाची तर ललित वाड्.मयासाठी मुंबई येथील विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम' या ग्रंथाची निवड झाली आहे. बालवाड्.मय प्रकारात गोवा येथील रमेश वंसकर यांच्या 'वार्या वार्या आंबे पाड' या बालकाव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. तीन हजार रूपये रोख, शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या ट्रस्टच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून मराठी साहित्यातील विविध लेखन प्रकारासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात येत आहे. याच योजने अंतर्गत विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिकांच्या साहित्य सेवेची दखल घेऊन त्यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. पाच हजार रोख, मानपत्र, शाल, श्रीफळ असे 'साहित्यव्रती' पुरस्काराचे स्वरूप असून हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यंदा यवतमाळ येथील साहित्यिक, विचारवंत रमाकांत कोलते यांना त्यांच्या प्रदीर्घ व निरंतर साहित्यासेवेसाठी देण्याचा निर्णय पुरस्कार समितीने घेतला. या पुरस्कार योजनेसाठी प्राप्त झालेल्या ग्रंथांचे मान्यवर परिक्षकांनी परीक्षण केल्यानंतर पुरस्कार समितीच्या सभेत यावर शिक्कामोर्तब करण्यात येऊन पुरस्कारांचे मुख्य आयोजक आमदार प्रवीण पोटे पाटील, श्रेयस पोटे पाटील, समितीच्या संयोजक प्राचार्य डॉ. शोभा रोकडे यांनी पुरस्कारांची घोषणा केली. यावेळी पुरस्कार समितीचे सदस्य प्रा. डॉ. कुमार बोबडे, प्रा डॉ. पंकज वानखडे, आर. एस. तायडे, डॉ. मंदा नांदूरकर, ॲड. प्राजक्ता राऊत उपस्थित होते. या पुरस्कारांचे वितरण 25 मार्च रोजी सकाळी 11 वाजता पी. आर. पोटे पाटील ग्रूप ऑफ एज्यूकेशन इन्स्टीट्यूट, मुख्य कार्यालय सभागृह, कठोरा रोड, अमरावती येथे एका सोहळ्यात करण्यात येईल. या समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आर. जे. मित्र परिवाराने साजरा केला शिव जन्मोत्सव सोहळा

## मनीष पावडे अमरावती भूषण पूरस्काराने सन्मानित



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )** - सर्वज्ञ फाउंडेशन रोटी बँकेचे संस्थापक अध्यक्ष मनीष रमेश पावडे यांना अमरावती भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आर. जे. मित्र परिवार, गाडगे नगर यांच्यावतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात मनीष पावडे यांच्या सामाजिक व अन्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना अमरावती भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गाडगेबाबा मंदिरासमोरील प्रांगणात हा सोहळा पार पडला. यावेळी प्रसिद्ध गायक व अभिनेता अवधूत गांधी यांचा लोकसंगीत, शिव गीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांनी आपल्या कलेतून उपस्थितांची मने जिंकली व वाहवा मिळविली. कार्यक्रमस्थळी सुरेख सजावट, रोषणाई करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल अवधूत गांधी यांनी आयोजकांचे कौतुक केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी महापौर किरण महल्ले यांच्यासह शहरातली गणमान्य नागरिकांची उपस्थिती होती. आयोजकाकडून सर्वज्ञ फाउंडेशन रोटी बँकेचे कार्याची माहिती देण्यात आली. सरस्वती नगर अमरावती येथे सर्वज्ञ् फाउंडेशन ही संस्था निराधारांना आधार देण्याचे सामाजिक कार्य गेल्या आठ वर्षापासुन करीत आहे. स्व. रमेश पावडे यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या या संस्थेचे अध्यक्ष मनिष पावडे व सचिव वैशाली पावडे तसेच त्यांचे सहकारी आठ वर्षापासून नियमित काम करित आहे. संस्थेचे कार्य-रोज अन्नदान, नेत्रहीन व अपंग विवाह सोहळ्याचे आयोजन करून नवविवाहितांना मदत करणे, हिवाळ्यात ब्लँकेट वाटप, उन्हाळ्यामध्ये पाणपोई, निराधार बांधवांना चप्पल वाटप, अंध विद्यालयात साहित्य वाटप, निराधार लोकांचे कटिंग दाढी, रुग्णांना मदत, अपंगांना मदत, वृक्षारोपण, पक्ष्यांसाठी घरटी तयार करणे असे उपक्रम सातत्याने पार पाडले जात आहेत. सामाजिक कार्यासाळी संस्थेला अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. मनीष रमेशराव पावडे व वैशाली मनीष पावडे यांचा कार्यक्रमांमध्ये शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# प्राणघातक हल्ल्यात जखमी इसमाचा मृत्यू

## वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.21 )-** लाठ्या काठ्याच्या मारहाणीत जखमी झालेल्या एका इसमाचा उपचारादरम्यान 19 मार्च रोजी रात्री मृत्यू झाला. रामकृष्ण उखंडराव केवदे (55, रा. रा. वझरखेड, वलगाव) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणात वलगाव पोलिसांनी आरोपींविरुध्द आता हत्येच्या कलमान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु केली होती. रामकृष्ण हे दुपारी 12 वाजता दरम्यान मासोळ्या पकडण्यासाठी गेले होते. त्यावेळी मासोळी पकडण्याच्या कारणावरून त्यांचे काही जणांसोबत वाद झाले. दरम्यान त्यांना तिघांनी लाठ्याकाठ्यांनी मारहाण करून गंभीर स्वरूपात जखमी केले. या घटनेनंतर जखमीला औषध उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे पुढील उपचारासाठी नागपूर रेफर करण्यात आले होते. परंतु त्यांना डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पिटलमध्ये औषध उपचाराकरिता दाखल करण्यात आले. दरम्यान 19 मार्च रोजी रात्री दहा वाजता मृत्यू झाला. या घटनेची माहिती वलगाव पोलिसाला देण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी पीडीएमसीत जाऊन पुढील कारवाई केली. ही घटना होळीच्या दिवशी आहे. परंतु वलगाव पोलिसांनी आरोपीवर कुठलीही कारवाई केली नसल्याचा आरोप मृतकाच्या नातेवाईकांनी लावला आहे. हल्लेखोर व मृतक हे एकाच समाजाचे आहे.

# वीज बिलाची परस्पर वसुली करुन रक्कम लंपास

## महावितरणच्या कर्मचार्यांचा प्रताप | तिवसा तालुक्यातील गैरप्रकार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.21 )-** महावितरणमध्ये जनमित्र (वायरमन) म्हणून कार्यरत असलेल्या वरिष्ठ तंत्रज्ञ सचिन राऊत याने तिवसा तालुक्यातील मार्डी, दिवाखेड व चिखली येथील अनेक थकबाकीदारांकडून वीज बिलाची रक्कम परस्पर वसुल करुन त्याचा भरणा करता रक्कम लंपास केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यातून या कर्मचार्याजने वीज ग्राहकांसोबतच महावितरणचीही फसवणूक केली आहे.

ग्रामीण भागात बहुतांश वीज ग्राहक प्रत्यक्ष केंद्रावर जावून बिल भरण्याऐवजी वीजवितरण जनमित्र यांच्याकडेच वीज बिलाचे पैसे देत असतात. ग्रामीण भागात वीज वितरण कंपनी जनमित्र आणि वीज ग्राहक यांच्यात सुसंवाद असतो.

याचाच गैरफायदा घेऊन रहाटगाव शाखेचे जनमित्र सचिन राउत याने मार्डी, दिवानखेड आणि चिखली या गावातील गरीब ग्राहकांना वीज बील भरले नाही तर वीज पूरवठा खंडित करण्याची धमकी दिली आणि त्यांच्याकडून वीज बिल भरण्याच्या नावाखाली पैसे घेतले. हे पैसे त्याने महावितरणच्या केंद्रात भरणे आवश्यक होते. मात्र तसे न करता ही रक्कम त्याने लंपास केली.

ही बाब उघडकीस आल्यानंतर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा व ज्या ग्राहकांच्या रकमेचा भरणा करणे बाकी आहे, ती रक्कम सचिन राऊत यांच्या वेतनातून कपात करण्यात यावी व ग्राहकांचे बिल भरण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी तक्रार मुख्य अभियंता महावितरण, अमरावती विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी गाव सहेली महाराष्ट्र संचालिका मंगला भोगे, देवेंद्र भोंडे, दिपकसिंग बावरी उपस्थित होते.

# महिला कॅशियरकडून 2 लाख 23 हजाराने फसवणूक




**महासागर प्रतिनिधी**


**अमरावती, ( दि.21 )-** पतसंस्थेच्या ग्राहकांकडून वसुली करून महिला कॅशियरने 2 लाख 23 हजाराने फसवणुक केली. या घटनेची तक्रार संजय सुर्यभान शेंडे (52, रा. टोपेनगर) यांनी 21 मार्च रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी महिला आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला.

संजय शेंडेंच्या तक्रारीनुसार, 14 ऑक्टोबर 1999 रोजी पतसंस्थेची स्थापना झाली होती. सदर पतसंस्थेत व्यवस्थापक म्हणून प्रल्हाद कोंडुंजी शेंडे होते, तर कॅशीयर एक महिला होती, तर लिपीक अशोक तुरकाने आणि दैनिक वसुली करणार्या महिलेची पतसंस्थेत नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर कोरोना काळात आर्थिक अडचणीमुळे पतसंस्थेचे खातेदार व संचालक मंडळ हे व्यवस्थापक संजय शेंडे यांना भेटले. त्यांनी सांगितले की, कॅशियर महिला ही आमच्याकडून दैनिक वसुली करीत आहे. या माहितीवरून संजय शेंडे यांनी चौकशी केली असता, पतसंस्थेच्या बजत खाते पुस्तकात व साधे दोन रेघी रजिस्टरमध्ये एकुण आठ खातेदारांकडून 2 लाख 23 हजार 600 रुपये घेतल्याचे निदर्शनास आले. पतसंस्थेचे व्यवहार बंद असताना खातेदारांकडून वसुली केले. त्याचप्रमाणे दिशाभुल करून, अध्यक्ष व संचालक मंडळ यांना न सांगता पतसंस्थेच्या बचत खात्याचे रजिस्टरमध्ये बनावट दैनिक वसुलीच्या नोंदी घेतल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे ते पैसे पतसंस्थेत जमा न करता, सदरचे पैसे अप्रामाणिकपणाने स्वताऱ्हा जवळ ठेवले आणि परस्पर ते पैसे परत करून पतसंस्थेची फसवणुक केल्याचे निदर्शनास आले. अशा तक्रारीवरून पोलिसांनी महिला आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# आठवडी बाजाराच्या आडोशाने गोवंशाची तस्करी

## पायदळच नेली जातात जनावरे | नियमांचे सर्रास उल्लंघन, पोलिसांचे दुर्लक्ष



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.21 )** - वाहनांतून गोवंशाची तस्करी केली तर गोरक्षक लक्ष ठेवून असतात. त्यानंतर पोलिसांकडूनही कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता असते. त्यामुळे गोवंशाची तस्करी करणारे लोक त्यासाठी वेगवेगळी शक्कल लढविताना दिसतात. सध्या गोवंश तस्कर आठवडी बाजाराच्या आडोशाने पायदळ गोवंशाची तस्करी करित असल्याचे प्रकार समोर आले आहेत. नियमांचे उल्लंघन करुन हा गैरप्रकार सर्रास सुरु असला तरी पोलिस प्रशासनाचे मात्र त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष आहे.

मोर्शी येथील आठवडी बाजार आटोपल्यानंतर तेथून पायदळ गोवंश चांदूरबाजार कडे नेला जातो. चांदूरबाजारहून याच पद्धतीने परतवाडा, अमरावती मार्गे गोवंशाची



हिंदुत्ववादी सरकार असूनही कत्तलीसाठी गोवंशाची तस्करी

कॉउ स्कॉड निष्क्रिय? | मध्यप्रदेशातून खुलेआम होते वाहतूक



मग त्या कारवाया का थांबल्या?

पोलिसांची मूकसंमती तर नाही ना!

पालकमंत्र्यांनी घालावे लक्ष



गोवंश हत्याबंदी कायद्याची जिल्ह्यात पायमल्ली

तस्करीसाठी बनावट ईटॅगचा वापर | प्रकरण उघडकीस येऊनही कारवाई नाही



येथून होते तस्करी

पालकमंत्र्यांनी लक्ष द्यावे

शिंदे सरकारने स्थापन केला होता आयोग

तस्करी केली जाते. सूर्योदय आणि सूर्यास्तानंतर पायदळ जनावराच्या वाहतुकीस बंदी असताना देखील हा प्रकार सर्रास सुरु आहे. ही जनावरे कत्तलीसाठीच नेली जात असल्याचे बोलले जाते. अनेक पोलिस ठाण्यांच्या समोरुन आणि हद्दीतून गोवंशाची अशा पद्धतीने तस्करी केली जात असली तरी पोलिस विभाग याकडे दुर्लक्ष करतो. कोणतीही कारवाई केली जात नाही. मागील काळात प्रशिक्षणार्थी आयपीएस समीर शेख यांनी धडक कारवाई करत बाजारसमिती मधून होत असलेल्या गोवंश तस्करीचा प्रकार उघडकीस आणला होता. त्यानंतर मात्र अशी कारवाई थंडबस्त्यात पडली आहे.

त्यानंतर तत्कालीन अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक गौतम लखमी आणि अविनाश कुमार व डॉ. हरी बालाजी एन यांच्या कार्यकाळात देखील मोठ्या प्रमाणावर गोवंश तस्करांवर अंकूश लावण्यात आला होता. हरी बालाजी एन यांनी यांच्या कारकिर्दीत धडक कारवाईमुळे तस्करीला मोठ्या प्रमाणात आळा बसला होता. जिल्ह्यातील अवैध धंदे देखील त्यांनी मोठ्या प्रमाणावर कमी करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र आता अधिकारी बदलल्याने पुन्हा जिल्ह्यात अवैध धंद्याबरोबर गोवंश तस्करीचे प्रकार वाढत आहेत. याकडे पोलीस अधीक्षक यांनी लक्ष देणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

### चांदूर बाजार पोलिसांकडून मुकसंमती ?

चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर गोवंश तस्करी होत असताना आठवडी बाजाराच्या दिवशी पोलीस कर्मचारी ब्राम्हणवाडा थडी चौकात वाहनांना थांबवून त्यांच्याकडून आर्थिक व्यवहार करताना दिसतात, अशी चर्चा आहे. अमरावती ग्रामीण पोलीस दलातील एका पोलीस अधिकार्युने सांगितले की सर्व वरूनच सुरू असल्याने आम्हाला कारवाई करता येत नाही, त्यामुळे वरून म्हणजे अमरावती ग्रामीण पोलीस दलात अधीक्षक कार्यालयकडून अवैध धंदे सुरू राहू द्या असे सांगण्यात आले की काय हा आता संशोधनाचा भाग आहे. मात्र जिल्ह्यातील अवैध धंदे आणि गौवंश तस्करी वर नियमित कारवाई होणे आवश्यक आहे. त्यासाठी ठाणेदारांना निर्देश द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

# जाहीर नोटीस

**अर्ज क्र. ००९/कलम ३६ ( १ ) ( अ )/२०२५**

**पद्मनाभ स्वामी संस्थान खोलापूर ता. भातकुली अमरावती रजि नं.ए : ८७२/अमरावती**

वरील अर्जदाराने वरील नमूद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती येथे केलेली आहे. मौजे भातकुली भाग १ ता. भातकुली जि. अमरावती येथील जुना शेत सर्व्हे/गट क्र. २२८/२ नविन शेत सर्व्हे/गट क्र. ५४८ एकूण क्षेत्रफळ १ हे.१७ आर आकार रू. ६.०० ही जमीन विक्रीस काढलेली आहे. त्याची चर्तु:सिमा पुढिल प्रमाणे -

चर्तुसिमा -

१) पुर्वेस - श्री उमक यांचे शेत

२) पश्चिमेस - शेख इब्राहिम यांचे शेत

३) उत्तरेस - श्री. कांडलकर यांचे शेत

४) दक्षिणेस - वन विभागची जमीन

त्या अर्थी या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, जर सदरहू मालमत्तेवरील विक्री बाबत कोणालाही काही आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत मा. धर्मादाय सह आयुकत अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकीलामार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्यावर दाखल करावे त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २०/०३/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

कोर्ट शिक्का

**( वि.सु. चव्हाण )**
**अधिक्षक ( न्यास )**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**